# योग्य अहवाल देण्यास ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर व्हावा - धनंजय मुंडे

MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक - दिपक थोरात

## धाकट्या अलंकापुरीत श्रावणी महोत्सवाचा समारोप !



शिरूर कासार (प्रशांत बाफना): धाकटी अलंकापुरी संबोधल्या जाणाऱ्या सिध्देश्वर संस्थानवर गेली महिणाभर सुरू असलेल्या श्रावणी महोत्सवाचा समारोप मंगळवारी संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे काल्याच्या किर्तनाने झाला यावेळी महाप्रसाद देण्यात आला .सिंदफना नदीकाठी असलेल्या किमान आठशे वर्षाचे हेमाडपंथी मंदिर वै.आबादेव महाराज यांनी संस्था अशी ओळख करून दिली होती त्यांचे पश्चात उत्तराधिकारी स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी अथक प्रयत्नातून धाकटी अलंकापुरी हे संस्थान ओळखले जाऊ लागले . महिणाभर सतत धार्मिक कार्यक्रम पहाटे काकडा ,नित महाअभिषेक , चार वाजता महिलाचे पोथी वाचन ,हरिपाठ सायंकाळी भजन असा नित्य कार्यक्रम सुरू होता ,किमान पन्नास वर्षापासुन सुरू असललेला ओम नमः शिवाय या नामजपाचा सप्ताह होत असतो आजही तो उपक्रम चालूच आहे . मंगळवारी या सर्व कार्यक्रमाचा समारोप काल्याच्या किर्तनाने संपन्न झाला उपस्थित भाविकांना महाप्रसाचे वाटप करण्यात आले .

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३४३ | बुधवार दि.०४ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -343 | WEDNESDAY DT.04 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# गुडघाभर पाणी भरलेल्या शेतातून मनोज जरांगेंचा थेट धनंजय मुंडेंना फोन

जालना : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील (चरपेक्ष गरीरपसश) यांनी आज (दि.४) अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातल्या बाणेगाव येथे पाहणी करताना मनोज जरांगे यांनी थेट कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनाच फोन लावला. यावेळी शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची विनंती मनोज जरांगे यांनी त्यांना केली. दरम्यान सरसकट शेतकऱ्यांना मदत करणार असल्याचे आश्वासन कृषी मंत्र्यांनी दिल्याचे देखील मनोज जरांगे यांनी यावेळी म्हटलं. मनोज जरांगेंनी घनसावंगीमध्ये बोलताना याबाबत भाष्य केलं आहे.


मनोज जरांगे काय काय म्हणाले?

मनोज जरांगे पाटील म्हणाले, मला कशात राजकारण करायचं नाही. दुसरा कोणी असता तर त्यांना डायरेक्ट बोलला असता. मला कोणत्याही गोष्टीत राजकारण करायचं नाही. सध्या धनंजय मुंडे (ऊहरपरपक्षरू चींपवश) कृषीमंत्री आहेत. त्यांनी सध्या एक शब्द वापरलाय. आम्ही सरसकट नुकसान भरपाई देणार आहोत. म्हणजे पंचनामेही केले जाणार नाही. म्हणजे कोणाची पाईपलाईन वाहून गेली असेल तर पंचनामे होणार आहेत. आम्ही सुद्धा विश्वास ठेवायला तयार आहोत. त्यांनी १० दिवसांच्या आत नुकसान भरपाई देऊ, असं सांगितलं आहे. नाही दिली भरपाई दिली तर मनोज जरांगे रस्त्यावर उतरेल. त्यांची काळजी नाही, असंही जरांगे यांनी स्पष्ट केलं.

आम्हाला आमचा शेतकरी वाचवायचा आहे, जगवायचा आहे

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, मला प्रत्येक गोष्टीत राजकारण करायचं नाही. आम्हाला आमचा शेतकरी वाचवायचा आहे, जगवायचा आहे. याच्यामध्ये कोणताही जातीवाद नाही. त्यांचा फोन लागत नाही. आपण त्याचा गैरअर्थ काढला नाही. आपण अर्थ काढला की, ते काहीतरी कामात असतील. प्रत्येक वेळेस राजकारण करायचं आणि आडवं बोलायचं या धंद्यात मी पडत नाही. कामात असले तर १०० टक्के माणूस परत कॉल करतो. त्यांनी माघारी कॉल केला होता. त्यांनी आता शब्द दिलाय. तो शब्द त्यांना पाळावा लागणार आहे. आम्ही शेतकऱ्यांना मदत मिळवणार आहोत. मदत नाही दिली तर राज्यातील शेतकरी मी रस्त्यावर आणेन. यांना जगणे सुद्धा मुश्किल करेन. माझ्या शेतकऱ्याचा जीव चाललाय, असंही मनोज जरांगे पाटील या वेळी बोलताना म्हणाले.





# लालपरीला ब्रेक! गेवराई आगारातील ३५० कर्मचारी संपावर

**गणेशोत्सवाच्या तोंडावर एसटी कर्मचाऱ्यांचा संप; सर्व सामान्य जनतेचे प्रचंड हाल!**

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : आगारातील साडेतीनशे कर्मचारी संपावर गेल्याने रोजच्या होणा-या ४५ फे-या बंद असल्याने १७ हजार किलोमीटर अंतराचा प्रवास रुतल्याने हाल होत असून, ऐन गौरी-गणपती उत्सवात एसटीची चाके बंद असल्यामुळे प्रवाशांना इतर वहातूकीचा आसरा घ्यावा लागत आहे. राज्य शासकीय कर्मचा-यां प्रमाणे एसटीच्या कर्मचा-यांना देखील वेतन देण्यात यावे यासाठी मंगळवार काल पासून गेवराईच्या आगारातील वाहक,चालक अन् इतर असे जवळपास ३५० कर्मचा-यांनी संपात सहभाग घेतल्याने काल आणि आज दुपापर्यंत आगारातील एक ही 'लालपरी'रस्त्यावर धावलेली नाही. ऐन सणासुदीत एसटीचे चाके थांबल्याने गेवराई आगारातील दररोज होणा-या ४५ फे-या बंद असून, साधारण रोजचा होत असलेला १७ हजार किलोमीटरच्या 'लालपरीच्या'प्रवाशाला ब्रेक लागला आहे.



दरम्यान,गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील गावखेड्यातील शहरातील शहरातील शाळेत शिक्षण घेत असलेल्या मुले-मुलींना संपामुळे अघोषित सुट्टी मिळाली आहे.संपावर तोडगा न मिळाल्यास लाखो रुपयांचे नुकसानास 'लालपरी'सामना करावा लागणार आहे.

# भगवानगडावरील माऊलींच्या मंदिरासाठी नागलवाडी ग्रामस्थांची ४५ लाख रुपये देणगी

## २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे नागलवाडी (ता.शेवगांव, जि.अहिल्यानगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ४५ लाख रुपये झाली.



# शेतीपिकांच्या नुकसानीची पाहणी करुन नुकसानीचे योग्य अहवाल देण्यास ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर व्हावा - धनंजय मुंडे

## कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा घेतला आढावा

परभणी (प्रतिनिधी)

मराठवाड्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे कृषि मंत्री धनंजय मुंडे परभणीच्या दौऱ्यावर आज दिनांक ४ ऑगस्ट रोजी आले होते. यादरम्यान त्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठास भेट देत येथील कार्याचा आढावा घेतला. यावेळी पाऊस आणि त्यामुळे होणारे नुकसान हे नेहमीचेच गणित असून महसूल व कृषी विभागास झालेल्या नुकसानीचे पाहणी अहवाल तयार करून नुकसानीची मदत मिळवून देण्यात बराच वेळ जातो, मात्र नुकसानीची पाहणी आणि नुकसानीचे योग्य अनुमान लावण्यात जर ड्रोन तंत्रज्ञानाची मदत घेतली तर वेळ, मनुष्यबळ दोन्हींची बचत होईल व शिवाय परिणामकारकता अधिक येईल, त्यामुळे फवारणी बरोबरच आता नुकसानीचा आढावा घेण्यातही ड्रोनचा वापर करण्याच्या दृष्टीने योग्य संशोधन व्हावे, अशा सूचना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी यावेळी विद्यापीठ प्रशासनास केल्या आहेत.

विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी कृषि मंत्री श्री धनंजय मुंडे यांचे ऑनलाईन स्वागत केले. तसेच माननीय कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांना प्रतिष्ठित अभियंता पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे मंत्री महोदयांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी विधान परिषद सदस्य मा. श्री राजेश विटेकर, माजी आमदार मा श्री मधुसूदन केंद्रे, निवासी उपजिल्हाधिकारी श्री जीवराज दापकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीमध्ये कृषि मंत्री श्री धनंजय मुंडे यांनी विद्यापीठाने अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीचे रक्षणाकरिता आणि सद्यस्थितीत पीक व्यवस्थापनासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला व पुढे म्हणाले की, विद्यापीठाने विकसित प्रक्षेत्रावर पूर्णतः संगणकीकरण तसेच यांत्रिकीकरण करून स्वयंचलीत शेती विकसित करावी तसेच ड्रोनद्वारे फवारणीबाबत चर्चा करून ड्रोन फवारणीसाठी विद्यापीठाने सध्या आकारलेला दर कमी करावा. ड्रोनचा वापर सध्या नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करण्यासाठी करावा आणि पिकांचे कितपत नुकसान झाले याचा अंदाज द्यावा असे नमूद केले. पिकांच्या उत्पादनामध्ये नॅनो खतांमुळे उत्पादन खर्चात ६० टक्के बचत होईल आणि उत्पादनात ५० % नी वाढ होवू शकते असे नॅनो खतांचे महत्त्व असल्याने नॅनो खताच्या वापरास चालना द्यावी. या विद्यापीठाचे कुलगुरू मा डॉ. इन्द्र मणि हे पिकांच्या पोषक तत्त्वांच्या ड्रोन-आधारित अनुप्रयोगांसाठी, ज्यात नॅनो फॉर्म्युलेशनचा समावेश आहे, यासाठीचे मानक मार्गदर्शक तत्त्वे (डेझ) विकसित करण्यासाठीच्या ड्रोन समितीचे अध्यक्ष असल्याने नॅनो खते मोफत देण्यासाठी शिफारस आणि प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार द्यावा. याबरोबरच सोयाबीन उत्पादनामध्ये सोया मिल्क म्हणून उत्पादित करण्यासाठी भारतीय अन्न सुरक्षिता आणि प्रमाण संस्था, यांच्याकडे पाठपुरावा करावा. याबरोबरच विद्यापीठांमध्ये बांबू लागवडीसाठी चालना देण्यासाठी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर तसेच रस्त्यालगत बांबूची लागवड करावी अशा सूचना दिल्या.



यावेळी कुलगुरू मा डॉ. इन्द्र मणि यांनी बिजोत्पादनासाठी विद्यापीठाने साडेतीन हजार एकर जमीन विकसित केल्याचे तसेच महाराष्ट्र मेकॅनायझेशन सेंटर बाबत माहिती दिली. संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी विद्यापीठाचे बीजोत्पादन मागील वर्षी १०२०० क्विंटल झाले होते. यावर्षी हे लक्ष दुपटीने करून २०००० क्विंटलवर नेहण्यात येईल व भविष्यात ५०००० क्विंटलचे लक्ष निर्धारित केल्याचे सांगितले तसेच विद्यापीठाने शेतकऱ्यांच्या विकासासाठी तसेच शैक्षणिक विकासासाठी विद्यापीठाने विदेशातील व देशातील अग्रगण्यश विद्यापीठे व संस्थेचसोबत सामंजस्य करार केले असुन याचा लाभ कुशल मनुष्यिबळ निर्मिती करण्या्स होणार असल्याचे नमूद केले. तसेच विद्यापीठ शेतकरी केंद्रित कार्य करत असून नियमित विस्तार कार्या बरोबरच दर मंगळवारी आणि शुक्रवारी सायंकाळी सात वाजता ऑनलाईन शेतकरी शास्त्रज्ञ संवाद घडवून आणला जातो. याबरोबरच प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू पासून ते विद्यापीठाच्या सर्व कार्यालयातील अधिकारी शेतकऱ्यांसाठी माझा एक दिवस माझ्या बळीराजा सोबत हा विशेष उपक्रम राबवत आहेत असे सांगितले.

कुलसचिव डॉ. संतोष वेणीकर यांनी विद्यापीठाचा महसूल वाढ होण्याच्या दृष्टीने बीजोत्पादन प्रकल्प, उती संवर्धित केळी आणि उसांच्या रोपांना मागणी असल्याने या प्रकल्पांना मंजूर देण्याची विनंती केली. यावेळी नियंत्रक श्री प्रवीण निर्मळ, विद्यापीठ अभियंता श्री दीपक कशाळकर, सहयोगी अधिष्ठाता डॉ सय्यद इस्माईल, डॉ. जया बंगाळे, डॉ. आर डी क्षीरसागर, डॉ. वासुदेव नारखेडे, डॉ. राजेश कदम, डॉ. विश्वनाथ खंदारे, डॉ. गजेंद्र लोंढे, लातूर विभागाचे कृषि सहसंचालक श्री साहेबराव दिवेकर तसेच विविध विभागाचे विभाग प्रमुख, विद्यापीठातील प्रमुख शास्त्रज्ञ आदींची उपस्थिती होती.

# शिक्षक असावा घडणारा व घडविणारा

आदर्श आणि प्रेरणादायी शिक्षकांच्या विचारातील सकारात्मकता, आशावाद, मुलांना जगण्याचे बळ देते. भविष्यात येणाऱ्या संकटांवर जर मात करावयाची असेल तर शिक्षकांना स्वतःला घडविण्याची, उत्तुंग शिखर गाठण्याची आस ठेवावी लागणार आहे. जीवनाकडे बघण्याचा दुर्दम्य आशावाद ठेवावा लागणार आहे. तसेच वास्तवाला सामोरे जाण्याची जिद्द असावी लागणार आहे. शिक्षकांनी दररोजच शिक्षक दिन समजून चांगले काम करण्याची गरज आहे. तरच चांगले व संस्कारक्षम विद्यार्थी घडले जातील.

शाळेत विद्या प्राप्त करणारे विद्यार्थी आणि त्यांना सदैव शैक्षणिक प्रक्रियेत मदत करणारे शिक्षक यांचे संबंध घनिष्ट व चांगल्या स्वरुपाचे हवेत. शिक्षकाला मातीला आकार देणाऱ्या कलाकाराची भूमिका निभावताना विद्यार्थ्यांवर सुसंस्कार, नीतीमूल्य, सकारात्मक, जीवनदृष्टी यांची सुंदर नक्षी उमटवायची आहे. त्यामधूनच उद्याचे आदर्श नागरिक घडणार असून देशाचे भवितव्य ठरणार आहे. प्रत्येक विद्यार्थी कशात ना कशात पारंगत असतो. त्याची आवड, कल शिक्षकाने ओळखला पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्यांमधील चांगला गुण व त्याच्यातील सुप्त गुण ओळखून त्याच्या व्यक्तीमत्वाचा विकास करणे खऱ्याअर्थाने काळाची गरज आहे.

शाळेत ज्ञानार्जन करतांना शिक्षकांच्या मनात विद्यार्थ्यांच्या अनेक अडचणी समोर उभ्या असतात. मुलचं कच्ची आहेत, अभ्यास करत नाहीत, नियमित शाळेत येत नाहीत, नियमित आली तर वह्या, पुस्तके नसतात, ती अस्वच्छ राहतात, गृहपाठ करीत नाहीत, धिंगाना करतात, शिकवत असतांना लक्ष देत नाहीत आदी. विद्यार्थ्यांच्या बाबतीत येणारा हा नकारात्मक दृष्टिकोन कमी करण्यासाठी शिक्षकांना आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे. अडचणी तर येणारच. समस्याही जाणवणारच. मात्र, स्वतःच्या कौशल्याने व हातोटीने त्यांच्या अडचणी व समस्या बाबतीत मुळाशी जावून प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. यासाठी विद्यार्थ्यांची वाहवा, अभिनंदन व वेळोवेळी शाबासकी देवून त्यांच्यातील चांगल्या गुणांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे, त्यासाठी शाळेमध्ये विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करणे अगत्याचे आहे.

शिक्षण प्रक्रियेचा विचार केला तर शिकविणारा शिक्षक व शिकणारा विद्यार्थी हे दोन महत्त्वपूर्ण घटक असून त्यांचा एकमेकांवर सतत परिणाम होत असतो. सध्याच्या नवनवीन तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी आलेली आहे. यासाठी विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी एकत्र येऊन विचार करण्याची गरज निर्माण झालेली आहे. कारण भविष्यात तंत्रस्नेही शिक्षकांना, विद्यार्थ्यांना फार किंमत असणार आहे. यासाठी शिक्षकांची कार्यतत्परता खूप महत्वाची आहे. शिक्षकांच्या छोट्या - मोठ्या कृतीतून हे संस्कार जोपासण्यासाठी शिक्षक मातृहृदयी असायलाच हवा.



यामुळे मुलांवरील दडपण कमी होवून आनंददायी शिक्षण होईल व वर्गातील वातावरण प्रेरक होवून मुले आनंदाने शिकतील.

शिक्षकांचे वक्तीमत्व जेवढे प्रभावी, परिणामकारक, ज्ञान समृद्ध असेल तेवढे ते विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असणार आहे. आज भेडसावणारी आव्हाने आणि भविष्यातील समस्या, अडचणी यांना सामारे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे हे शिक्षकांचे ध्येय व आद्यकर्तव्य असले पाहिजे. शिक्षकांनी स्वतः होवून स्वतःमधील उणिवा जाणीवपूर्वक दूर केल्या पाहिजेत. तरच शिक्षक आपले अध्यापनाचे कार्य अधिक प्रभावी, रंजक, आनंददायी, ज्ञानरचनावादी आणि सुलभपणे करू शकतील.

विद् म्हणजे जाणणे, मग जो खूप जाणतो तो विद्वान समजला जातो. शिक्षक इतर बाबतीत विद्वान असेल किंवा नसेल पण शाळेत आपल्याला जे शिकवायचे आहे त्या विषयात तो विद्वान असलाच पाहिजे. आपल्या विषयाच्या अनुषंगाने नवनीवन ज्ञान मिळवून, वेगवेगळ्या शैक्षणिक साहित्याचा अवलंब करून आपले ज्ञान शिक्षकांनी अद्ययावत ठेवलेच पाहिजे. ज्या शिक्षकांचा तास प्रसन्न व आनंददायी शिकविण्यासाठी खर्च होईल त्या शिक्षकांचे विद्यार्थी नक्कीच ऐकून एकाग्रतेने अभ्यास करतात.

शिक्षक हा वाचनप्रिय असला पाहिजे. स्वतःचा काहीना काही ग्रंथसंग्रह असणे आवश्यक आहे. आपल्या ज्ञानाची कक्षा काळानुसार असणे आवश्यक आहे. त्यामुळे कामात निर्माण होणाऱ्या अडचणी व कोणतेही प्रश्न हातळण्याची कला आपल्यात उपलब्ध होते. शिक्षक हा नेहमी चिंतन करणारा म्हणजेच चिंतनशिल असावा. कारण कोणत्याही समस्येची उकल होण्यासाठी सखोल चिंतनाची नितांत गरज असते. शिक्षकाने विविध प्रकाराची शैक्षणिक चर्चा करण्याची गरज असते. विद्यार्थ्यांच्या गैरवर्तनाच्या, बेशिस्तीच्या समस्या एकट्याने सोडविण्यापेक्षा सामुदायिक पद्धतीने सोडविल्या पाहिजेत, त्यामुळे इतरांची मने जाणून घेण्यासाठी व समस्या हाताळण्यासाठी नवनवीन उपाय निघू शकतात. आपल्या शाळेत येणाऱ्या समस्या व अडचणी यांच्या नोंदी ठेवण्याची सवय शिक्षकांमध्ये असायला हवी. आपल्या लेखनातून, पथनाट्यातून, एकांकिका, कथा, गीते, कविता, लेख यातून शिक्षक आपल्या समस्या नक्कीच मांडू शकतात. यातून त्यांच्या विचारांची तीव्रता इतरांना कळते. त्यावर चर्चा घडते आणि समस्यांचा व अडचणींच्या चक्रव्यूहातून मार्ग निघला जातो.

सध्याचे युग हे संगणकाचे युग आहे. त्यामुळे शिक्षकांनी तंत्रस्नेही होणे आवश्यक आहे. संगणकामुळे विद्यार्थ्यांना अधिकची माहिती देता येते. शेवटी श्राव्य साधनांपेक्षा दृकश्राव्य साधन अधिक प्रेरणा देत असते. त्यामुळे शाळांमधून परिक्षार्थी तयार करण्यापेक्षा खरे प्रयोगवीर तयार होण्यासाठी प्रत्येक शाळा ही साक्षात प्रयोगशाळा झाली पाहिजे. शिक्षकांनी आपल्याला सोपविलेले काम आनंदाने, ज्ञानरचनावादी पध्दतीने, कुशलतेने, अचुकपणे वेळेत व नियमांच्या आधीन राहून करावयास हवे. प्रत्येक शिक्षकाने नवनवीन अध्यापन तंत्राचा अवलंब करून आपला विषय सोपा करुन शिकवला पाहिजे. त्या विषयाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध लावून शिक्षण हे खऱ्याअर्थाने जीवन शिक्षण झाले पाहिजे.

मुलांना अध्यापन करतांना शिक्षकांकडून कळत नकळत राजकीय परिस्थितीबाबत वैयक्तिक मते मांडली जातात तर कधीकधी अंधश्रद्धा निर्मूलनासारखे विषय मांडताना विद्यार्थ्यांच्या श्रद्धेला, भावनेला धक्का पोहचणारी विधाने होतात. हे शिक्षकांनी टाळावयास हवे. अनेकवेळा आपला विषय शिकवत असतांना समाजाबद्दल नकारात्मक विचार मांडले जातात. जसे समाज खूप वाईट झाला आहे, आजकाल खरे बोलून चालत नाही. पूर्वीचा समाज चांगला होता, सध्या तसा समाज राहिला नाही. आता कलियुग आहे. कधी नष्ट होईल सांगता येणार नाही. अशी मते मांडली जातात. हे चुकीचे आहे. नकारात्मक दृष्टिकोनामुळे मुलांच्या संस्कारक्षम मनावर सखोल परिणाम होत असतो. त्यामुळे मुलांच्या मनात एक विकृती निर्माण होवून समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून जातो. म्हणून शिक्षकांचे विचार सकारात्मक असावेत.

आदरणीय साने गुरूजी म्हणतात जो मुलांना पावसात भिजायला शिकवतो, आकाशाशी दोस्ती करायला शिकवितो तो खरा व यशस्वी शिक्षक होय. नाही तर विद्यार्थ्यांना गणिताची सूत्रे येतात पण त्या मागची तर्कसंगती समजत नाही. मग आयुष्यात तो विसंगतीचाच पाठपुरावा करतो. विद्यार्थी कविता शिकतात पण त्यातील सौंदर्य त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. विज्ञानाचे प्रयोग करतात पण त्यामागील विज्ञाननिष्ठा रुजत नाही. शिक्षकांनी आपल्या समाजातील प्रतिमेला तडा जाणार नाही, आपल्या सुखदुखाचा, मानअपमानाचा लवलेशही विद्येच्या प्रांगणात प्रतिबिंबित होणार नाही याची दक्षता घेतली तरच ज्ञानदानाचे पवित्र कार्य तेवढ्याच तन्मतेने, उत्कटतेने पार पडेल.

कधीकधी शिक्षक पालकांना नावे ठेवतात तर कधीकधी पालक शिक्षकांना नावे ठेवतात. दोघेही एकमेकांना नावे ठेवण्यातच गुंग होतात. यात विद्यार्थी मध्येच सापडतो व त्याची कसलीही चूक नसतांना विनाकारणच त्याची शैक्षणिक हेळसांड होते. त्यामुळे पालकांचा शाळेची नियमित संपर्क असला पाहिजे. विद्यार्थ्यांमधील कच्चे दुवे दोघांनी मिळून शोधले पाहिजेत आणि चर्चेतून ते दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पालक व शिक्षक एकत्र आले तर त्यांच्या समन्वयातूनच उद्याची पिढी संस्कारक्षम झाल्याशिवाय राहणार नाही.

तेंव्हा शिक्षक हा शिक्षण देत - देत स्वतः घडणारा असावा व विद्यार्थ्यांना घडविणारा असावा. तरच भविष्यात शैक्षणिक क्षेत्राला चांगले दिवस येवून देशाला चांगले नागरिक मिळतील. तेंव्हा शिक्षकदिनानिमित्त सर्व आदर्श शिक्षकांना मनापासून हार्दिक शुभेच्छा....!!!

राजेंद्र लाड
आष्टी,जि.बीड
(राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक) मो.९४२३१७०८८५

# केज औद्योगिक वसाहतीचा मार्ग मोकळा निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी पिसेगाव

केज (प्रतिनिधी)

वर्षांपासून केज येथील औद्योगिक वसाहतीचा प्रश्न प्रलंबित होता. आता उद्योग वाढीसाठी पोषक असणाऱ्या औद्योगिक वसाहतीसाठी जागा उपलब्ध झाल्याने हा प्रश्न मार्गी लागला आहे. तर प्रस्तावित औद्योगिक वसाहतीसाठी पिसेगाव येथील १६ हेक्टर गायरान जमीन आरक्षित करण्यास प्रशासनाने अंतिम मान्यता दिली आहे.केज येथे उद्योगास चालना मिळण्यासाठी प्रस्तावित आद्योगिक क्षेत्रासाठी पिसेगाव येथील सर्वे. १०० मधील गायरान जमीन भूसंपादन करण्याची मागणी होती. याबाबत अनेकवेळा केजच्या आ. नमिता मुंदडा यांनी देखील मागणी केली होती. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांना संबंधित जागेची माहिती उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

येथील २६.२४ हेक्टर व कुंबेफळ येथील सर्वे नं. १५७ मधील १७.७३ हेक्टर जमीन शिल्लक असल्याचे कळविताच औद्योगिक विकास महामंडळाच्या भुनिवड समितीने पाहणी केली होती. भुनिवड समितीच्या स्थळपाहणी अहवालानुसार हे क्षेत्र समतल व अतिक्रमण विरहित असून सदर क्षेत्राची संयुक्त मोजणी व कंटुर सर्वे अंती वाटप योग्य क्षेत्र असल्याचा अभिप्राय ही भुनिवड समितीने दिला आहे. त्यानुसार प्रस्ताव मंजुरीसाठी उच्चाधिकार समितीकडे सादर करण्यात आला होता. या प्रस्तावावर चर्चा करून चर्चेअंती पिसेगाव येथील सर्वे नं. १०० मधील १६ हेक्टर गायरान जमिनीस महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळ अधिनियम १९६१ चे कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करण्यास उच्चाधिकार समितीने मान्यता दिली आहे. केजच्या एम आय डी सी ला मान्यता मिळाल्यामुळे तालुक्यातील सुशिक्षीत बेरोजगार तरूणांच्या




हाताला काम मिळणार आहे.

आ नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, लोकनेत्या मा पंकजा मुंडे, मा खा प्रितम मुंडे, एम आय डी सी चे सर्व अधिकारी व जागा देणाऱ्या पिसेगाव ग्रामस्थांचे आभार व्यक्त केले आहेत.

# शिक्षक दिनी शिक्षक उतरणार रस्त्यावर

## ५ सप्टेंबर रोजी राज्यात विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने काळा शिक्षक दिन व रास्ता रोको आंदोलन

कोल्हापूर (प्रतिनिधी)

राज्यातील सर्व अंशतः अनुदानित शाळांना प्रचलित नियमानुसार अनुदानाचा वाढीव टप्पा मिळावा यांसह इतर मागण्यांसाठी कोल्हापूर येथील विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय येथे मागील ३३ दिवसांपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. मागील ८ दिवसांपासून विनाअनुदानित कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर व कोल्हापूर महिला जिल्हाध्यक्षा नेहा भुसारी मॅडम यांच्या समवेत कोल्हापूर जिल्ह्यातील कृती समितीचे पदाधिकाऱ्यांनी आमरण उपोषण सुरू आहे. कोल्हापूर सह राज्यातील विविध जिल्ह्यात एवढी आंदोलन करून ही शासन जाणून बुजून या आंदोलनाकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या विनाअनुदानित शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी ५ सप्टेंबर म्हणजेच शिक्षक दिनी

रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. ५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता कोल्हापूरमध्ये पुणे - बेंगलोर हायवेवर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यातील विविध जिल्ह्यातून शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी केले. राज्यातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना वाढीव टप्पा अनुदानाचा आदेश काढावा, जाचक संचमान्यतेचा आदेश रद्द करावा, यासह विविध मागण्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मागील काही दिवसांपासून आंदोलन सुरू केले आहे. आतापर्यंत राज्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये विविध प्रकारचे आंदोलन सुरू आहेत. गेली काही दिवसांपासून कोल्हापूर विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या परिसरात विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. रोज वेगवेगळ्या प्रकारची आंदोलने करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला पण या व कोणत्याच आंदोलनाची शासनाने दखल घेतलेली नाही. त्यामुळे आता आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय शाळा कृती समितीने घेतला आहे. त्यामुळे आता आंदोलन तीव्र करण्यासाठी शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष नेहा भोसरी मॅडम यांच्या नेतृत्वाखाली अनेक शिक्षकांनी आमरण उपोषण सुरू केले आहे आज उपोषणाचा नववा दिवस आहे. नऊ दिवस झाले तरी शासनाने अनुदानाच्या वाढीवर टप्प्याचा ठोस निर्णय घेतला नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या राज्यातील सर्व शिक्षकांनी कोल्हापूरमध्ये रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार उद्या ५ सप्टेंबर शिक्षक दिनी हजारो शिक्षक पुणे बेंगलोर महामार्गावर रस्ता रोको करणार आहेत. या आंदोलनासाठी राज्यभरातून हजारो शिक्षक कोल्हापूर मध्ये उपस्थित राहणार आहेत. या रास्ता रोको आंदोलनासाठी राज्यातील जास्तीत जास्त शिक्षक, महिला शिक्षिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांच्यासह पदाधिकारी यांनी केले आहे.

कृती समितीचे सोलापूर, नांदेड, बीड, सातारा, सांगली, पुणे, मुंबई, धुळे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून पदाधिकारी कोल्हापूरमध्ये दाखल झाले आहेत.

महिला शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार

सध्या राज्यामध्ये विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांचे सुरू असलेले आंदोलन म्हणजे आरपारची लढाई असे चित्र निर्माण झाले आहे. आता नाही तर कधीच नाही त्यामुळे या आंदोलनात महिला शिक्षिका कमरेला पदर खोसून आंदोलनात उतरल्या आहेत. राज्यातील विविध जिल्ह्यातून महिला शिक्षिका मोठ्या संख्येने कोल्हापूरमध्ये दाखल होत आहेत.

# संततधार पावसाचा अंबाजोगाई सह केज मतदार संघातील शेतकऱ्यांना फटका

## खरीप पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या-आ. नमिता मुंदडा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**राज्य भरात सुरू असलेल्या संततधार पावसाचा फटका अंबाजोगाई तालुक्यालाही बसला असुन तालुक्यातील अनेक गावात शेतात पाणी शिरून शेतीचे मोठ्या प्रमानावर नुकसान झाल्याने तालुक्यात ओला दुष्काळ जन्य परिस्थिती निर्माण झाली आसुन केज विधानसभा मतदार संघातील (जि. बीड) अंबाजोगाई, केज व बीड, तालुक्यातील नुकसानग्रस्त खरीप पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची आ नमिता मुंदडा यांनी शासना कडे मागणी केली आहे. गेली ३ ते ४ दिवसा पासून संपूर्ण महाराष्ट्रात संततधार पाऊस सुरू असून नद्या नाले तुडुंब भरून वाहू लागली आहेत. अनेक नद्यांना पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने काही गावचा संपर्क ही तुटला गेला आहे. या संतत धार पावसाचा फटका अंबाजोगाई तालुक्यालाही बसला असून अंबाजोगाई शहरासह तालुक्यातील अनेक गावातील घरात पाणी शिरले गेले आहे, अनेक घरांच्या भिंती पडल्याने**

मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. शहरातील बाढलेल्या अतिक्रमणा मुळे अनेक ठिकाणी नाल्या, नाले तुंबल्या मुळे रस्त्यावर घाण पाणी वाहू लागले.

शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची आ. नमिताताई मुंदडा यांची मागणी

केज विधानसभा मतदार संघातील (जि. बीड) अंबाजोगाई, केज व बीड, तालुक्यातील नुकसानग्रस्त खरीप पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची आ नमिता मुंदडा यांनी शासना कडे मागणी केली आहे. या संदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, केज विधानसभा मतदार संघातील (जि. बीड) अंबाजोगाई, केज व बीड, तालुक्यात दि. ३१/०८/२०२४ रोजीच्या सायंकाळ पासून मुसळधार पाऊस सुरु आहे. सततच्या पावसामुळे अतिवृष्टी झाल्याने तिन्ही तालुक्यातील खरीपाची पिके धोक्यात आली असून, मोठ्याप्रमाणावर खरीप पिकांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून




शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे अत्यंत गरजेचे आहे.

केज विधानसभा मतदार संघातील (जि. बीड) अंबाजोगाई, केज व बीड, तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त खरीप पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणेबाबत आदेश व्हावेत अशी मागणी आ नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री ना एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री मा ना धनंजय मुंडे, मदत पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांच्या कडे केली आहे.

शहरातील जुन्या भागात जैन गल्ली येथे पहाटे चीरबंदी भिंत एका चारचाकी गाडीवर कोसळल्याने या गाडीचे मोठ्या प्रमानावर नुकसान झाले असून दुर्दैवाने यात कुठलीही मनुष्य हानी झालेली नाही. तालुक्यातील अनेक गावात शेता मध्ये पाणी शिरल्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमानावर नुकसान झाले असून सर्वत्र ओला दष्काळ जन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

# वयाची शंभरी पार केलेल्या शेख जैतूनबी बाबामियाँ यांचे निधन

बीड (प्रतिनिधी)

ज्येष्ठ नागरिक शेख जैतूनबी बाबामियाँ यांनी नुकतेच दिनांक ९ जुलै २०२४ रोजी आपल्या वयाची शंभरी पूर्ण केली होती. वयाची शंभरी पूर्ण केल्यानंतर दोन महिन्यांनी काल दिनांक ३ सप्टेंबर २०२४ मंगळवार रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



बीड शहरातील मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्या त्या आत्या तथा मरहूम पोलीस पाटील शेख बाबामियाँ यांच्या पत्नी होत्या. त्यांचा जन्म ९ जुलै १९२४ रोजी अहेमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात असलेल्या चिचोंडी (शिराळ) येथे झाला होता. काल दिनांक ३ सप्टेंबर २०२४ मंगळवार रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांची नमाज ए जनाजा सकाळी ०९:०० वाजता बेलापूर येथे पठण करण्यात आली तर दफनविधीही तेथील कब्रस्तानात करण्यात आला. त्यांच्या मागे पाच मुले-सुना, दोन मुली-जावई, नातवंडे-पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे बीड, चिचोंडी शिराळ, दर्गाह दायरा आणि एकलहरे येथे शोककळा पसरली आहे. शेख कुटुंबीयांच्या दुःखात दैनिक आरंभ परिवार सहभागी आहे.



# विठ्ठल अंदुरे यांना पत्नी शोक

शिरुर कासार (प्रशांत बाफना)

मूळ खरवंडी कासार येथील रहिवासी परंतु कामानिमित्त शिरूर कासार येथे वास्तव्यात असणारे विठ्ठल मथाजी अंदुरे यांच्या पत्नी सौ रुक्मिणी विठ्ठल अंदुरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले मृत्यू समय त्या ४१ वर्षे वयाच्या होत्या अत्यंत शांत संयमी व कष्टाळू वृत्तीच्या म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक होता शिरूर कासार येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश शंकरराव निनगुरकर यांच्या त्या भगिनी होत त्यांच्या पश्या मध्ये पती एक मुलगा एक मुलगी जावई असा परिवार आहे

# शालेय विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून संपात सहभागी न होणाऱ्या

## पाटोदा आगारातील कर्मचारी मिसाळ आणि मुळे याचे काम कौतुकास्पद :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश: राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी अचानकपणे राज्यव्यापी संप पुकारत कामकाज बंद केले आहे.बीडसह राज्य राज्यभरातील बसेस दिवसभर जागच्याजागीच थांबल्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत.बीड जिल्ह्यातील सर्वच आगारातील कर्मचारी सहभागी झाले असल्याने जिल्ह्यातील ८१२ फे-या रद्द करण्यात आल्या आहेत.याचवेळी पाटोदा आगारातील वाहक मिसाळ जी.एम.आणि चालक सुभाष मुळे यांनी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी एसटी वाहतूक सुरुच ठेवली असुन त्यांच्यावर सर्वस्तरातुन कौतुकाचा वर्षाव होत आहे.



काल पासुन सुरु असलेल्या राज्य व्यापी एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपात आम्ही जरी सहभागी असलो तरी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक विद्यालयातील जवळपास २५० विद्यार्थ्यांना आम्ही नियमित सोय करत असल्याने त्यांचे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी आम्ही मसेवाडी ,पिंपरनई , पोखरी , सोमनाथवाडी, महाजनवाडी गावातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून कालपासूनच कामावर आहोत.असे पाटोदा आगारातील वाहक मिसाळ जी.एम.आणि चालक सुभाष मुळे यांनी सांगितले.

एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू असल्याने संपाच्या कालावधीत प्रवास वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी खाजगी प्रवासी बसेस,स्कुल बसेस, कंपनीच्या मालकीच्या बसेस व मालवाहु वाहतूक करण्यास गृहविभागाने परीवहन विभागाला दिली असली तरी खाजगी वाहतूक करणारांकडुन गोरगरीब प्रवाशांची आर्थिक लुट केली जात असताना ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी उचललेले पाऊल कौतुकास्पद आहे.



**दिव्यांग बांधवांना ५% टक्के निधी लवकर वाटप करावा. संकेत लंगडे**

**प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्याची पंचायत समिती कार्यालयाकडे निवेदनाद्वारे मागणी**

वडवणी (प्रतिनिधी)

पंचायत समिती वडवणी अंतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामपंचायत ग्रामसेवकांनी तात्काळ दिव्यांग ५% निधी वाटप करावा यासाठी गटविकास अधिकारी कार्यालयास प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी माजलगाव प्रहार तालुका अध्यक्ष गोपाळ पैंजणे, वडवणी प्रहारचे प्रशासकीय मार्गदर्शक उत्तम विधीज्ञ सुनील डोंबाळे साहेब, वडवणी तालुकाध्यक्ष संकेत लंगडे व दत्ता भारती, विशाल लंगडे,उपस्थीत होते.

# डॉ. आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण



मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एस टी) च्या मध्यवर्ती कार्यालयात, मुंबई सेंट्रल येथे महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्या हस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार विश्व भूषण प. पू. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण आज शुक्रवारी ३० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता तिसऱ्या मजल्यावर करण्यात येणार आहे. कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटनेच्या वतीने गेल्या १५-२० वर्षांपासून ही मागणी करण्यात आली होती. व तिचा पाठपुरावा केला होता एस टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार डॉ माधव कुसेकर यांनी स्विकारल्यानंतर त्यांना कास्ट्राईब रा प कर्मचारी संघटनेच्या वतीने प्रत्यक्ष भेटून विनंती केली त्यानंतर त्यांनी तातडीने पावले उचलली व अवर मुख्य सचिव यांच्याकडे परिवहन खात्याकडून परवानगी मिळावी यासाठी प्रयत्न केले त्यानंतर परिवहन खात्याने परवानगी दिली तसेच कला संचालक यांनी सुद्धा पुतळा बसविण्यात मान्यता दिली. त्यामुळे हा अर्धपुतळा बसविण्याचा मार्ग मोकळा झाला. ह्या अनावरण समारंभाला सर्व खाते प्रमुख तसेच सर्व संघटना प्रमुख पदाधिकारी यांना रा प प्रशासनाच्या वतीने निमंत्रित करण्यात आले आहे अशी माहिती कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस सुनिल निरभवणे यांनी दिली आहे. या कार्यक्रमास बीड विभागातून कश्रस्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटनेचे बीड विभागीय अध्यक्ष ससाणे सुरेश बीड विभागीय सह सचिव राजेश मस्के, कुणाल गोदाम आस्थपणा पर्यवेक्षक या कार्यक्रमास महाराष्ट्रातून सर्व विभागातून पदाधिकारी व कार्यकर्ते आणि मुंबई सेंट्रल चे सर्व आधिकरी, कर्मचारी पदाधिकारी उपस्थित होते.

# मुख्याधिकारी नीता अंधारे पोहोचल्या फिल्डवर

बीड (प्रतिनिधी)

गेल्या दोन वर्षांपासून शहरातील प्रभाग क्रमांक १९ मध्ये येणाऱ्या तेलगाव नाका, गांधीनगर, ईदगाह नगर आदी भागातील रस्ते, नाल्या, लाईट आणि पाण्याच्या समस्यांसाठी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे या जातीने फिल्डवर पोहोचल्या आणि तिथे एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ तसेच पक्षाचे प्रभागाध्यक्ष शेख निहाल अहेमद यांच्याकडून व्यथा जाणून घेतल्या तसेच स्वच्छता, नाल्यांची बांधणी चे काम लवकरात लवकर सुरू करू तसेच रस्त्याच्या निर्माणासाठी नगर परिषदेला निधी उपलब्ध झाला की रस्ते ही करून देऊ असे आश्वासन दिले.



**शफिक भाऊ, निहाल अहेमद यांच्याकडून जाणून घेतल्या व्यथा**

तत्पूर्वी दिनांक २६ ऑगस्ट रोजी ए आय एम आय एम पक्षाकडून शफिक भाऊ च्या मार्गदर्शनानुसार निहाल अहमद यांच्या या प्रभागात मूलभूत सोयी सुविधा बीड नगर परिषदेने उपलब्ध करून द्याव्यात याकरिता नगर परिषदेसमोर आमरण उपोषण करण्यात आले होते यात निहाल अहमद तसेच शेख सलीम यांचे असं प्रभागातील अनेक नागरिकांसह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते तेव्हा लिखित आश्वासनामुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आले होते. त्यानुसार काल दिनांक ३ सप्टेंबर २०२४ मंगळवार रोजी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे या जातीने या प्रभागात जाऊन स्वतः पाहणी करत शफिक भाऊ आणि निहाल अहमद यांच्याकडून नागरिकांच्या समस्या व्यथा आणि प्रश्न ऐकून घेतले. आणि आश्वासन दिले की स्वच्छता आणि नाल्या बांधणीचे कार्य लवकरच सुरू करण्यात येईल तसेच पाणीपुरवठा ही सुरळीत करण्यात येईल आवश्यक ठिकाणी लाईट्स लावण्यात येतील आणि बीड नगर परिषदेला निधी उपलब्ध झाल्यास रस्तेही तयार करून देऊ असे म्हटले. यावेळी पक्षाचे बीड तालुका अध्यक्ष तथा जिल्हा उपाध्यक्ष शेख एजाज खन्ना भैय्या, शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर, जिल्हा सहसचिव अन्वर पाशा, अय्युब भाई, अमीर साहब, बांधकाम शहराध्यक्ष सय्यद बासेद, सामाजिक कार्यकर्ते सादेख पठाण, समीर भाई, हाजी एजाज, खमर, शेख चाँद, सादेख, नसीर, मुस्तफा, अब्बास, रईस, बासेद, अनिस, समीर, तुराब, दिलावर,अमर, मुन्ना, दस्तगीर, जावेद खान ,अकबर भाई, हबीब भाई मुस्तफा भाई,आदींसह मोठ्या संख्येने भागातील नागरिक उपस्थित होते.



**परळी तालुका संजय गांधी निराधार योजना अध्यक्षपदी चंदू भैया कराड व सदस्य पदी तुकाराम आचार्य यांची निवड करण्यात आली आहे तसेच शिरसाळा सर्कल मधील जनसामान्यांमध्ये आनंदाचे व कौतुक कसपद मिळाल्याने त्यांचा सत्कार आला आहे नगरपालिका परळी गटनेते वाल्मीक अण्णा कराड यांनी केला आहे तरी त्यांच्यासोबत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते राजेभाऊ चाचा पोळ आचार्य टाकळी गावचे सरपंच रामभाऊ तात्या घोडके शरद राठोड हे उपस्थित होते तुकाराम आचार्य हे सर्व समाजामध्ये समाजाचे काम करण्यासाठी उत्साहीत असतात व त्यांना गोरगरिबांच्या संजय गांधी निराधार योजना या सदस्य पदी निवड झाल्याबद्दल ते या पदाच व लोकांच्या कामना पूर्णवेळ कामाची उपलब्ध असतात त्यांचा योग्य सन्मान करण्यात आला आहे त्यांना पुढील कार्यास खूप खूप शुभेच्छा**

# गेवराई तालुक्यातील पांढरवाडीत तरुणाचा खून!

## खून का बदला खून; बीड जिल्ह्यात एकच खळबळ


## आरोपींना अटक करा, त्यांना फासावर लटकवा, आम्हाला न्याय द्या!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पांढरवाडी येथे एक २६ वर्षीय तरूणाचा तीक्ष्ण हत्यार पोटात खुपसून निर्घृण खून केला आहे. ही थरारक घटना दि.३ रोजी घडली आहे. या घटनेने बीड जिल्हा हादरला आहे. घटनेनंतर मयताच्या आई, पत्नी, बहिण, भावासह इतर नातेवाईकांनी मृतदेह जिल्हा रूग्णालयात आणत पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आक्रमक पवित्रा घेत आरोपींना अटक करा, त्यांना फासावर लटकवा, आम्हाला न्याय द्या, तलवाडा पोलीसावर कारवाई करा म्हणत आक्रोश केला होता. तसेच आम्हाला एसपींना भेटू द्या अन्यथा येथून उठणार नाही असे म्हणत नातेवाईक अधिकच आक्रमक झाले होते. त्यानंतर पोलीस बंदोबस्त वाढवून आक्रमक नातेवाईकांना पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांनी शांत केले होते.

सविस्तर वृत्त असे की, गेवराई तालुक्यातील पांढरवाडी येथे दोन चिमुकल्यांच्या खूनाच्या बदल्यात एका तरूणाचा खून करण्यात आला असल्याची चर्चा आहे. बालाजी भगवान घरबुडे (वय २५) असे खून करण्यात आलेल्या तरुणाच नाव आहे. या पांढरवाडीतील भावले आणि घरबुडे कुटुंबीयात मागील काही महिन्यांपासून विस्तवही जात नव्हता. इतकी त्यांच्यामध्ये वितुष्ट आलं होतं. याच वितुष्टातून पाच महिन्यापूर्वी मोठं हत्याकांड घडलं होतं.

भावले कुटुंबातील दोन चिमुकल्या मुलांवर विष प्रयोग करुन त्यांचा खून करण्यात आला असल्याची माहिती मिळत आहे. यासाठी घरबुडे कुटुंबाकडून भावले कुटुंबातीलच एका व्यक्तीला पाच लाख रुपयांची सुपारी देण्यात आली होती. या धक्कादायक घटनेनंतर घरबुडे आणि भावले कुटुंबातील वाद एकदम विकोपास गेला होता. दरम्यान, मंगळवार दि.०३ सप्टेंबर रोजी दुपारी बालाजी घरबुडे या तरुणावर धारदार शस्त्रानं सपासप वार करून खून केला आहे. अचानक झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यात रक्तबंबाळ बालाजी जागीच कोसळला त्यानंतर आरोपीनं घटनास्थळावरुन पळ काढला. या घटनेचे माहीती मिळताच तलवाडा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, फौजदार स्वप्नील कोळी, पोलीस हवालदार महेश



झिकरे हे घटनास्थळावर दाखल झाले. त्यानंतर बालाजी भावलेचा मृतदेह उत्तरीय तपासणीस गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आला होता.

# नवगण महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी डॉ मधुकर आघाव यांची निवड

परळी (प्रतिनिधी)

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये गेल्या २८ वर्षापासून प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे डॉ मधुकर आघाव यांची नुकतीच महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. परळी तालुक्यामध्ये राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये डॉ आघाव यांची यशस्वी वाटचाल राहिलेली आहे. वैद्यनाथ उद्योग समूहाचे चेअरमन म्हणून त्यांनी अनेक फॉर्म यशस्वी चालविल्या आहेत. जिल्हा परिषद सदस्य



म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केलेले आहे. वाणिज्य विषयांमध्ये डॉक्टरेट पदवी मिळाल्यानंतर त्यांची वाणिज्य व इतर सांस्कृतिक क्षेत्रातील काही पुस्तके प्रकाशित आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये त्यांचे शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या प्रशासकीय कामांचा लाभ महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी व्हावा व संस्थेची जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडावी म्हणून क्षीरसागर कुटुंबीयांनी त्यांच्यावर विश्वास दर्शविलेला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल पालकमंत्री श्री धनंजय मुंडे साहेब यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे तसेच संस्थेचे सचिव डॉ भारतभुषणजी क्षीरसागर संस्थेच्या मार्गदर्शक डॉ दीपाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष युवा नेते डॉ योगेश भैय्या क्षीरसागर, डॉ सारिकाताई क्षीरसागर तसेच नवगण महाविद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे डॉ अनिल घुगे, श्री बाळासाहेब देशमुख, श्री उदगीरकर, संस्थेच्या प्रशासकीय समितीचे श्री देशमाने सर, श्री गुट्टे सर, उपप्राचार्य डॉ लालासाहेब घुमरे इत्यादींनीही त्यांच्या या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे. डॉ आघाव यांच्या निवडीमुळे परळीच्या शैक्षणिक वातावरणात उत्साह दिसून येत

# मुप्टा बीड जिल्हाध्यक्ष शरद मगर यांचा शिक्षक संवाद दौरा

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेजड् टीचर्स असोसिएशन (मुप्टा) शिक्षक संघटनेचा बीड जिल्हा संवाद दौरा मुप्टा संस्थापक सचिव नेते प्रा.सुनील मगरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष शरद मगर हे बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात शिक्षक संवाद दौरा ५सप्टेंबर २०२४-शिक्षक दिनापासून सुरू करत आहेत.

महाराष्ट्रात मुप्टा शिक्षक संघटना ही आक्रमकपणे शिक्षकांच्या प्रश्नावर लढणारी संघटना म्हणून एक वेगळी ओळख आहे. आत्तापर्यंत कित्येक शिक्षकांना न्याय मिळवून दिला आहे. शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर लोकशाही पद्धतीने आक्रमकपणे आंदोलने केले आहेत. जुनी पेन्शन योजना, अनुदान टप्पा वाढ, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित ,आश्वासित प्रगती योजना, वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी प्रस्ताव, असे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी मुप्टा कटीबद्ध आहे.जिल्हाध्यक्ष शरद मगर हे बीड जिल्ह्यातील अकरा तालुक्यामध्ये शिक्षकांच्या विविध प्रश्नावर चर्चा, मुप्टा सदस्य नोंदणी अभियान, संघटना धोरण , संघटनेची व्याप्ती वाढवणे याबाबत पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद



साधणार आहेत.या शिक्षक संवाद दौऱ्यामध्ये बीड जिल्ह्यातील पदाधिकारी यांचा समावेश आहे.

## धनंजय मुंडे पूरग्रस्त परळीकरांच्या भेटीला

# पुरग्रस्तांची भेट घेत नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश; प्रशासनास तातडीने मदतीचे निर्देश

### घरात पाणी शिरलेल्या नागरिकांच्या भोजनाची नाथ प्रतिष्ठान करणार व्यवस्था

परळी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज परळी शहरात सोमवारी झालेल्या पावसाने पुराचे पाणी शिरलेल्या विविध भागांमध्ये भेटी देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली. पूरग्रस्त नागरिकांना भेटी देत चर्चा करून धनंजय मुंडे यांनी नागरिकांना दिलासा दिला. यावेळी पुरामुळे घरात पाणी शिरून झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनास दिले.

मागील दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील सरस्वती नदीस मंगळवारी सकाळी पूर येऊन नदीकाठच्या अनेक वस्त्यांमधील घरामध्ये पाणी शिरले होते. अंबेवेस भागासह अनेक गल्लीत पाणी शिरले होते. या पाण्यातून मार्ग काढीत राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी दुपारी शहरातील पूरग्रस्त भागात भेट देऊन तेथील नुकसानग्रस्त नागरिकांची



**कैफियत ऐकून घेतली व नगरपालिका प्रशासनास स्वच्छता करून व तेथील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याच्या सूचना केल्या.**

घरात पाणी शिरून धन-धान्याचे नुकसान झालेल्या नागरिकांना तहसील मार्फत तात्काळ आपत्ती प्रतिसाद निधी देण्याची कार्यवाही करणे त्याचबरोबर नाथ प्रतिष्ठान च्या वतीने घरात-संसारात पाणी शिरलेल्या नागरिकांच्या भोजनाची व्यवस्था करण्याच्या सूचनाही धनंजय मुंडे यांनी दिल्या आहेत.

यावेळी त्यांच्यासोबत परळीचे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, नगरपालिकेचे उपमुख्यअधिकारी संतोष रोडे, रा.कॉ.चे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, श्रीकृष्ण कराड, अनंत इंगळे , राहुल ताटे,तखी खान आदी उपस्थित होते. शहरातील नरहरी मंदिर , गंगासागर , खुदबेनगर ,इंदिरानगर ,रहिमत नगर ,मिलिंद नगर भिमानगर, बरकत नगर ,शाही फंक्शन हॉल, आंबेवेस परिसरास भेट देवून तेथील नुकसानग्रस्त भागाची पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पाहणी केली. नुकसानग्रस्त भागात प्रशासनाचे पथक सर्वे करीत आहे अशी माहिती उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी दिली. त्यानंतर धनंजय मुंडे हे परळी-अंबाजोगाई तालुक्यातील पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी रवाना झाले होते.

# चोराच्या भीतीने गावकरी रात्र जागून काढू लागले

### रात्री बे रात्री अनोळखी व्यक्ती दिसल्यास पोलिसाशी संपर्क करा- एपि आय सोमनाथ नरके

सुमेध करडे तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील तलवाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत समर्थ विद्यामंदिर तसेच भोसले वस्तीवर दोन दिवसांपूर्वी रात्री चोरांनी धुमाकूळ घातला होता तसेच या भीतीने रात्री वेळ रात्री चोर गावात येतील गल्लीतील लोकांनी रात्र जागून काढली असून भीतीचे वातावरण गावकऱ्यात निर्माण झाले असून सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके यांनी अनोळखी व्यक्ती कोणी दिसल्यास तात्काळ पोलिसांची संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी तलवाडा ते गेवराई या रोडवर



अडवोकेट सुरेश हत्ती यांच्या पेट्रोल पंप पाशी भोसले वस्ती तसेच समर्थ विद्यामंदिर आहे या ठिकाणी दोन दिवसापूर्वी शाळेत राहणारे निवासी विद्यार्थी रात्री एक दोन च्या दरम्यान चोर आले असताना त्या ठिकाणी असलेले लहान लहान विद्यार्थी रडू लागले चोरांनी मात्र विद्यार्थ्यांच्या पालकांनी दिलेले बिस्कीट खालले व विद्यार्थ्यांना रडू नका म्हणत होते शाळेत काही न मिळून आल्यामुळे त्या ठिकाणी उभी असलेली एक मोटर सायकल चालू होत नसल्यामुळे त्या मोटरसायकलचे नुकसान केले असून चोरांनी पुढील भोसले वस्तीवर जाऊन त्या ठिकाणी गोरख मराठे यांच्या घरात प्रवेश केला शांताबाई गोरख मराठे या महिलेस त्यांनी मारहाण केली असून सोने दागिने तसेच मोबाईल दीड ते दोन लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला या घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके व निरीक्षक स्वप्निल कोळी, तात्काळ त्या ठिकाणी जाऊन पंचनामा करण्यात आला असुन दुसऱ्या दिवशी ही बातमी सर्वत्र होत असताना गावकऱ्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून काल ची रात्र एकमेकाच्या संपर्क राहून गावकरी जागून रात्र काढली असलेचे दिसुन येत आहे या घटनेची माहिती मिळताच गावामध्ये पोलीस गस्त वाढवण्यात आला असून ग्राम सुरक्षा दलाची स्थापना पुनर्गठीत करण्यात येइल तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये अशी कोणी व्यक्ती रात्री बे रात्री फिरत असल्यास तात्काळ पोलीस स्टेशनची संपर्क करावे

सोमनाथ नरके

सहाय्यक पोलीस निरीक्षक

तलवाडा

## श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावरील उत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित रहा- विश्वस्त

**शिरुर कासार**
**(प्रशांत बाफना)**

**प्रात:स्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभलेली श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावरील पार्थिव पूजेची सांगता उत्सव आज दिनांक चार बुधवार रोजी मोठ्या थाटात व उत्साहाच्या वातावरणामध्ये साजरा होत असून या सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री क्षेत्र गहिनीनाथ गगडाच्या विश्वस्थांनी केले आहे**



श्री संत वामनभाऊ महाराज यांनी श्रावण महिन्यात श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर महिनाभर पार्थिव पूजेची सुरुवात केली तीच परंपरा आज तागायत महंत गुरुवर्य ह भ प विठ्ठल महाराज यांनी ती पुढे चालू ठेवली असून आजही गेली महिनाभर ते स्वतः ही पूजा करतात महिन्याच्या शेवटी प्रतिपदेला म्हणजे करी या दिवशी या उत्सवाची सांगता मोठ्या उत्साहाच्या वातावरणामध्ये करून हजारो भाविकांना मिस्टन्नाचाचा महाप्रसाद दिला जातो यामुळे पूर्वीच्या जुनाट वाईट प्रथा बंद होते या मागचा खरा उद्देश आहे श्री संत वामनभाऊ महाराज यांचा होता पूर्वी या भागात पोळ्याच्या करीला सर्वत्र नको ते भक्षण केले जात असे म्हणून आणी या द्वारे हजारो पशुंचा बळी घेतला जात असे यामुळे भाऊंनी ही प्रथा करीच्या दिवसाला साजरी केली या उत्सव प्रारंभ केला होता तो आजही गुरुवर्य महंत विठ्ठल महाराज स्वतः महिनाभर दररोज वारुळाच्या मातीचे शिवलिंग तयार करून दररोज विसर्जित करतात यास पार्थिव पूजा असे म्हटले जाते ती पूजा उत्सव आज दिनांक चार बुधवार रोजी सकाळी एक ते दुपारी एक वाजेपर्यंत होऊन दुपारी महाप्रसाद प्रसादाने या उत्सवाची सांगता होणार आहे तेव्हा या सोहळ्याला सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री क्षेत्र गहिनीनाथ संस्थांची विश्वस्तांनी केले आहे



परळी तालुक्यातील कवडगाव घोडा कवडगाव भवानी टाकळी या गावची स्वतः लक्ष घालून आरंभ या न्यूज दाखवलेल्या गावाची महाराष्ट्राचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे साहेब यांनी तीन नऊ २०२४ ला लगेच त्या गावी जाऊन व झालेल्या पीक नुस्का नीचे शासनाला पंचनामे करण्याची सांगितले आहे व स्वतः पीक पाहणी करताना पाण्यामध्ये उतरून सोयाबीन पिकाची पाहणी केली ज्या शेतकऱ्यांची नुकसान झाले आहे अशा शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान उपलब्ध करून देऊ अशा सूचना देण्यात आल्या त्यांच्यासोबत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते राजेभाऊ चाचा कोळ कवडगाव घोड्याचे सरपंच दिलीप राठोड बालासाहेब गव्हाणे रामभाऊ तात्या घोडके व शिरसाळा परिसरातील सर्व शेतकरी बांधव उपस्थित होते

## अतिवृष्टीचे तात्काळ पंचनामे करून पन्नास हजार रुपये हेक्टरी अनुदान द्या-सादेक इनामदार

माजलगाव विधानसभा मतदार संघातील धारूर, माजलगाव, वडवणी तालुक्यातील अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून तातडीने पंचनामे करून ई पिक पाहणीची अट रद्द करून ओला दुष्काळ जाहिर करुन पिक विमा १००% मंजूर करावा, शेतकऱ्यांना कर्ज माफी मंजुर करून तात्काळ हेक्टरी ५० हजार रूपये अनुदान द्यावे अशी मागनी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे मराठवाडा अध्यक्ष सादेक इनामदार सह शेतकऱ्यांनी धारूर तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागील तीन दिवसापासून पडत असलेल्या सतत पावसामुळे सगळीकडे पाणीच पाणी झाले आहे. यामुळे धारूर माजलगाव



**ई पीक पाहणी रद्द करा.. कर्जमाफी करा**

वडवणी तालुक्यातील खरीप पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे मागील दोन वर्षापासून निसर्ग साथ देत नसल्याने शेतकरी मेटाकुटला आलेला आहे. शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीमध्ये सापडला आसून येणाऱ्या पिकावर पेरणीसाठी बँक व खाजगी सावकाराचे कर्ज घेतलेले कसे फेडणार या चिंतेमध्ये शेतकरी जगत आहे. अतिवृष्टीमुळे येणारे पीक गेल्याने शेतकरी हातबल झाला आहे.यासाठी भ्रष्टाचार निर्मूलन समितीने ३ सप्टेंबर मंगळवार रोजी शेतकऱ्याच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून ई पिक पाणी आठ रद्द करावी, पिक विमा १००% मंजूर करावा, कर्जमाफी द्यावी तसेच तात्काळ शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे यासाठी धारूर तहसील चे तहसीलदार यांना निवेदन देऊन राज्याचे मुख्यमंत्री, कृषी मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, जिल्हाधिकारी यांना प्रतीलीप्या दिल्या आहेत. मागणीची दखल न घेतल्यास जन आंदोलन उभा करणार असल्याचे भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे मराठवाडा अध्यक्ष सादेक इनामदार शेतकरी उत्तमलाल तोष्णीवाल, सचिन नखाते, तीबोले मामा, चव्हाण आदींनी सांगितले. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## मुस्लिम समाजाच्या भावना दुखवणाऱ्या राणेला अटक करा :-शेख युनूस

स्वर्गीय हिंदू सम्राट बाळासाहेब ठाकरे यांना भिऊन मुंबई सोडून कोकणात पळून जाऊन लपून बसणाऱ्या कोंबडीचोर राणेने स्वतःला शहाणे समजू नये आणि वादग्रस्त बोलू नये पोलिसाबद्दल असो किंवा मुस्लिम समाजाबद्दल असो नाहीतर मुस्लिम समाज पण त्याच भाषेत उत्तर देईल हे विसरू नये. पोलिसांना पण आरे तुरेची भाषा करतोस. कोणाच्या जीवावर एवढ्या उड्या मारतोस ? सर्व महाराष्ट्राच्या जनतेला माहिती आहे तू



कोण आहेस?महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेबआंबेडकर, शाहू महाराज,म. फुलें ,मौलाना आझाद, तुकाराम महाराजांच्या विचारांचे राज्य आहे.येथे जाती-जाती धर्मात भांडण लावण्याचे काम करू नको. शेवटी एक शेर म्हणावेसे वाटते. बहता हैं लहू गीता से, निकलता है खुन कुरान का,ना हिंदू का ना मुसलमान का, ये खून हैं हिंदुस्तान का !!

# नवगण राजुरी येथे गुरुवारपासून अखंड हरिनाम सप्ताह सुरु

नवगण राजुरी (प्रतिनिधी)

श्री मंगलमुर्ती देवस्थान नवगण राजुरी येथे प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री गणेश जन्मोत्सवानिमित्त दि.५ सप्टेंबर ते दि.१२ सप्टेंबर या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व.केशरकाकू क्षीरसागर आणि स्व.सोनाजीराव क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून आरंभ झालेल्या सप्ताहाची सुरूवात आचार्य अमृताश्रम स्वामी जोशी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गुरूवारपासून होत आहे. सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमात गणेशास नित्याभिषेक, पहाटे ४ ते ५ काकडा आरती, सकाळी १० ते १२ गाथा भजन, दुपारी ३ ते ५ गणेश पुराण, सायं.५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन त्यानंतर हरिजागर, भजन, भारूड आदि कार्यक्रम होणार असुन यात ह.भ.प.रामायणाचार्य रामराव महाराज ढोक नागपुर, ह.भ.प.भावरत्न समाधान महाराज शर्मा, ह.भ.प.साध्वीश्री सोनालीताई करपे, ह.भ.प.विद्यावैभव पांडुरंग महाराज शितोळे, ह.भ.प.शांतस्वरूप अशोक महाराज इलग, ह.भ.प.सगुणोपासक भक्तीदास महाराज शिंदे, ह.भ.प.विनोदाचार्य प्रकाश महाराज साठे यांचे हरिकिर्तन होणार आहे. शनिवार दि.७ रोजी सकाळी श्री गणेशास गंगेच्या कावडीने जलाभिषेक करण्यात येणार आहे. रात्री ११ ते १२ गणेश जन्माचे भजन होईल. बुधवार दि.११ रोजी महाद्वारचा अनादिकाला होईल त्यानंतर श्रींच्या पालखीची भव्य दिव्य मिरवणूक होईल. या सप्ताहाची सांगता गुरूवार दि.१२ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प.प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. तरी या अखंड हरिनाम सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळ नवगण राजुरी यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT